# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 05/08/2015 (का.प.क्र.5) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक 05 ऑगस्ट 2015 रोजी (का.प.क्र.5) मा.सभापती श्री.दिलीप थोरात यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 12.35 वा.वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अति.आयुक्त श्री.रमेश पवार,नगरसचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
02. स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले
03. स.स.श्री.नितीन रमन चित्ते
04. स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
05. स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप
06. स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे
07. स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
08. स.स.श्री.विकास प्रकाश एडके
09. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
10. स.स.श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
11. स.स.श्री.खान इरशाद इब्राहीम
12. स.स.श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
13. स.स.श्रीमती ज्योती राजाराम मोरे
14. स.स.श्रीमती रेश्मा अशपाक कुरैशी

श्री.नितीन चित्ते :सर्व महापालिकेचा एलबीटी शासनाच्या निर्णयानुसार बंद झाला.विकास कामे होणार की नाही भिती होती परंतु शासनाने विलंब न लावता 11-57 कोटी रक्कम मनपाच्या खात्यावर जमा केले अतिशय कार्यक्षम सरकार आहे असे म्हणावे लागेल याबध्दल मा.मुख्यमंत्री व मा.मंत्रिमंडळाचे अभिनंदन करावे.

श्री.गजानन बारवाल :अभिनंदन करण्यास अनुमोदन मनपाने सुध्दा कार्य चांगले करावे.

श्री.मोहन मेघावाले :शासनाने 11.57 कोटी दिले.मनपास महिण्याला पगारापोटी किती खर्च प्रत्येक महिण्याला हा निधी येणार काय आहेत का विकास कामास अडचणी येणार नाही यासाठी सक्षम अधिकारी वसुली व इतर उत्पन्न वाढविण्यासाठी नेमावे.शासनाने हा निधी दिला अभिनंदन करावे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :आपण सर्वांनी केलेले प्रयत्न व कामगार संघटनेस यश मिळाले. शासनाने अभिनंदन करावे.

श्री.गजानन मनगटे :नवनियुक्त नगरसचिव पदावर रूजू झालेले श्री.दिलीप सुर्यवंशी यांचे अभिनंदन करावे.

मा.सभापती :नगरसचिव यांचे अभिनंदन करण्यात येते.एलबीटी बंद व्हावी ही व्यापारी मंडळीची अनेक वर्षाची मागणी होती.शासनाने आश्वासन दिल्याने 1 ऑगस्ट पासून एलबीटी बंद केली. एलबीटी बंद करून त्याची तूट भरून काढण्यासाठी शासनाने लगेच प्रत्येक मनपास अनुदान दिले त्याबध्दल शासनाचे अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात येतो.

| | |
|---|---|
| श्री.गजानन बारवाल | :मनपातील श्री.पगडे नावाचे कर्मचारी मयत झाले त्यानंतर जी रक्कम मिळायला पाहिजे ती मिळाली नाही त्यांचे निवासस्थानास 20 हजार रूपये प्रतिमहा दंड भाडे लावले योग्य आहे का माहिती दयावी. |
| मालमत्ता अधिकारी | : श्री.पगडे यांचे दिनांक 12-11-13 रोजी मृत्यू झाला तेंव्हापासून 31-5-15पर्यंत त्यांचे कुटूंबीयांनी हे निवासस्थान वापरले.शासकीय निवासस्थान जास्त वेळ म्हणजे निवृत्तीनंतर 3 महिणे निवासस्थान वापरता येते असा शासन जीआर आहे त्यानंतर 50रू प्रति.स्क्वे.फुट पर महिना असा दंड आकारण्याची तरतूद केली आहे.ते आकारायचे की नाही  मुख्यलेखा परीक्षक यांचे अभिप्राय घेवून पुढील कार्यवाही होईल. |
| श्री.गजानन बारवाल | :त्यास 2542 भाडे होते आता 20 हजार प्रमाणे भाडे आकारले जाते.श्री.पगडे नावाचे कर्मचारी यांचा अकाली मृत्यू झाला त्यांचे कुटूंबीयास मोठा आर्थीक त्रास सहन करावा लागतो परीस्थिती हालाखीची आहे व यातून योग्य तो उपाय काढावा रु.331651 इतका दंड लावण्यात आलेला आहे.तो योग्य नाही. |
| अति.आयुक्त | :ही निवासस्थान मनपाची आहे शासनाचा जीआर शासकीय निवासस्थानासाठी आहे हे स्थानिक स्वराज्य संस्था आहे. जेव्हा कर्मचारी यांना निवासस्थान देतो ते निवृत्त होतात तेंव्हा काय निर्णय घ्यायला पाहीजे याचा अभ्यास करणे व योग्य ठोस निर्णय होणे गरजेचे आहे. प्रोसेस व्यवस्थीत हाताळावी लागेल. |
| श्री.गजानन बारवाल | :एकच खोली आहे एवढा दंड लावणे योग्य नाही माफ करावे जी त्यांची रक्कम देणे बाकी आहे ती त्यांचे कुटूंबीना मिळावी. |
| मा.सभापती | :या संदर्भात योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :एन-4 विदयानगर हौसींग सोसायटीच्या एका प्लॅाटवर सिडकोच्या सर्वेनुसार बांधकाम पुर्ण आहे मनपाच्या सर्वेनुसार बांधकाम नाही पहिले बांधकाम नकाशा सिडकोचे ना हरकत व दिलेली परवानगी नुसार झालेले बांधकाम न पाडता दुसऱ्यांदा परवानगी कशी दिली. पहिले कायदेशीर होते तर दुसरे बांधकाम कशासाठी मंजूर केले मनपाच्या अखत्यारीत भुखंडावर दुसऱ्यांना बांधकाम परवानगी देता येते का त्यासाठी काय नियम आहे.यात काही आर्थीक व्यवहार झाले का चौकशी करावी. |
| सहा.संचालक(न.र) | :या प्लॅाटची माहिती घ्यावी लागेल. |
| मा.सभापती | :स.सदस्यांना लेखी खुलासा करावा. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :एकाच ठिकाणी दोन वेळा परवानगी देऊ शकतो का पेपर आहे.ते आपणाकडे देतो. सिडकोने परवानगी दिली बांधकाम झाले पुन्हा परवानगी कशी दिली. |
| सहा.संचालक (न.र) | :सुधारीत बांधकामास परवानगी देऊ शकतो.जे कागदपत्र दिले त्यात आरसीसीचे बांधकाम  असे आहे. |
| श्री.नितीन चित्ते | :एकदा परवानगी दिल्यानंतर परवानगी रद्य करता येते का व तेथे बांधकाम झाले असेल तर रिवाईज परवानगी देता येते का? |
| सहा.संचालक (न.र) | :मुदतीमध्ये असेल तर देता येते.तिन दिवसात स.सदस्यांना माहिती दिली जाईल. |
| श्री.कमलाकर जगताप | :श्री.संजय टोनपे फाजलपुरा यांनी शौचालयसाठी 1200 स्वे.फुट प्लॅाट दिला. मोबदला दिला नाही. किती दिवसात कार्यवाही होणार आहे. |
| सहा.संचालक(न.र) | :सर्वसाधारण सभेने मंजूरी दिली त्यानुसार संचिका केली.भुसंपादनास मंजूरी मिळाल्यानंतर भुसपांदन अधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठविला जाईल 15 दिवसात कार्यवाही होईल. |

श्री.विकास एडके :प्रिया मार्केट मध्ये दोन बीअर शॉपी चालते.हे मनपाचे शॉपींग सेंन्टर आहे.कायदयाने तेथे हे चालविता येते का ?तिन दिवसात माहिती देणार होते दिली नाही.नियम पाळत नसतील तर सील वगैरे लावणेची कार्यवाही करावी.

मालमत्ता अधिकारी :यास नगररचना विभागाने ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :करारात काय आहे असे वापरासाठी परवानगी देता येते का?

मालमत्ता अधिकारी :स.सदस्यांना उत्तर दिले कोणत्याही दुकानाचा वापर करण्यासाठी एनओसी नगररचना विभागाकडून प्राप्त होते एनओसी दिली त्यात नमुद आहे की बिअरशॉपी साठी वापर देऊ शकतो. करारनाम्याची संचिका काढून माहिती दिली जाईल.

श्री.विकास एडके :बिअर शॉपीसाठी ते देता येणार नाही करारात म्हटले आहे.

मा.सभापती :असा परवाना देता येतो का संचिका व करारनामा तपासून तसा उल्लेख असेल तर त्वरीत रद्य करण्याची कार्यवाही करावी.

श्री.मोहन मेघावाले :माझ्या वार्डात डिमार्टचे काम झाले परवानगी होती दिली का व कशासाठी दिली व किती बांधकामासाठी होती टॅक्स कोणता लावला माहिती देतांना गोलमोल माहिती दिली सविस्तर माहिती मिळणे अपेक्षीत आहे.

सहा.संचालक(न.र) :माहिती सदस्यांना दिली आहे.

श्री.मोहन मेघावाले :पार्कींगचे बांधकाम करता येते का परवानगी दिली काय किती मजल्यापर्यत बांधकाम परवानगी दिली.

श्री.नितीन चित्ते :बांधकाम चालू असतांना संबधीत अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करायला पाहिजे. एकच अधिकारी यांचेकडे चार-चार चार्ज दिले जातात त्यामूळे असे प्रकार होतात याकडे लक्ष दिले जात नाही.शहरात 5217 टावर्स आहे असल्याचे एका दैनिकाद्वारे आले प्रशासन 371 सांगते त्यातील फक्त 43 टावर्सनी एनओसी घेतल्याची नोंद आहे.एका अधिका-याकडे एकच पदाचा स्वतंत्र चार्ज असावा अनधिकृत टावर्स मुळे मनपाचा टॅक्स 53 कोटी बुडाला यास जबाबदार कोण? असे होत असेल तर उत्पन्न येणार नाही विकास कामे होणार नाही.जेथे टॅक्स लागलेला आहे तेथे पुन्हा जातात. जेथे नाही तेथे सर्वे केला जात नाही व टॅक्सही लावला जात नाही मोबाईल टावर्स बाबत समिती नेमली अहवाल येईल.परंतु सद्यास्थितीत एक अधिकारी एकच चार्ज असावा एलबीटी बंद झाले आता मालमत्ता करावर भर दयावा लागेल. 10 वर्षापासून मालमत्ताचे रिव्हीजन नाही.एका टावर्सवर चार चार कंपन्या उपभोग घेत आहे.या बाबत स्टडी करण्याची गरज टावर्स असलेली इमारतीस परवानगी आहे का, टॅक्स कमर्शियल आहे का ती त्या स्ट्रक्चर नुसार तयार केली का सर्व बघायला पाहिजे.जीवीतहाणी झाल्यास जबाबदार कोण? आम्ही प्रश्न उपस्थित करतो प्रत्येक वेळी उत्तर मिळत नाही.पेपरला वेगवेगळया बातम्या येतात.चर्चा होते आऊटपूट काहीच निघत नाही या सर्व प्रकरणाची चौकशी करावी.

श्रीमती रेश्मा कुरैशी :आधार हॉस्पीटल हायटेक दवाखान्याची पार्कींगचा बेकायदेशीररित्या वापर होतो पत्र दिले योग्य माहिती दिली नाही. या बाबत मा.आयुक्त यांनी धोरणात्मक निर्णय घेण्याचे ठरवित आहे असे उत्तर मिळाले.

श्री.अब्दुल नाईकवाडी :रोडवर पार्कींग आहे. पाण्याची टाकी जवळच आहे तेथे लहान मुले जा ये करतात. स.सदस्यांना उडवाउडवीचे उत्तर दिले.

श्री.मोहन मेघावाले :वसुली चांगली केली तर ही समस्या येणार नाही अनधिकृत टावर्स बाबत कार्यवाही करावी एक अधिकारी एकच चार्ज असे असावे.दिल्लीगेट पासून पुढील मुख्य

रस्त्याच्या लगत अनेक फर्निचर विक्रेते बसतात या रस्त्याने रहदारी मोठी आहे अपघात होतात बाजूला नाली आहे तेथेच कचरा टाकला जातो.दुसरा प्रश्न असा की ताज हॉटेलच्या बाजूला डीमार्ट ला परवानगी किती व किती मजल्याची दिली कोणत्या वापरासाठी दिली टॅक्स कोणता आकारला माहिती दयावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :एका अधिका-याकडे एकच चार्ज असावा 7-7-15 रोजी पत्र दिले की दुकाना समोरील 15-15 फुट समोर आलेले शेड काढावे त्यामूळे पार्कींग रस्त्यावर होते व अपघात होतात.तेथील पाहणी करू नोटीस देऊ असे उत्तर मिळाले.समक्षमपणे अधिकारी काम करीत नाही.दखल घ्यावी.

श्री.नितीन चित्ते :सातारा गट नं 20,21 शहानुरवाडी येथील अतिक्रमण हे तीन-चार दिवसात काढले जाईल असे म्हटले होते खुलासा घ्यावा.

मा.सभापती :मोबाईल टावर्स संदर्भात सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार चौकशी समिती नेमली आहे अहवाल येईल. अधिकारी यांनी स.सदस्यांशी योग्य पध्दतीने बोलावे तशा सुचना प्रशासनाने अधिका-यांना दयाव्यात.

श्री.अब्दुल नाईकवाडी :तेरणा हायस्कूल जवळील भुखंडाची माहिती विचारली दिली नाही.

श्री.रावसाहेब आमले :माझ्या वार्डातील डीपी रोडवर अतिक्रमण झाले मनपाची जागा आहे वार्ड 14-15 येथे अनेक खाजगी शाळा कॉलेज सुरू त्यांना लागलेला टॅक्समध्ये मोठी तफावत त्या विरोधात संस्था चालक यांनी मा.कोर्टात प्रकरण दाखल केले मा.कोर्टाचा निर्णय लागलेला नाही असे असतांना शाळेचे इलिगल बांधकाम व अनेक ॲक्टीव्हिटीज चालू आहे व वापरही होतो आहे मा.कोर्टाचा निर्णय लागत नाही तोपर्यत अशा शाळा कॉलेजला सील करावे.

मा.सभापती :एक एक प्रश्न घ्यावा सातारा येथील अतिक्रमण संदर्भात खुलासा करावा

वार्ड अधिकारी (फ) :प्रशासकीय विभागाशी संबधीत विषय आहे.

श्री.नितीन चित्ते :गट नं.20,21 शहानुरवाडी सातारा या संबधीचा प्रश्न मी विचारला होता शासनाचे, मा.कोर्टाचे, प्रदुषण बोर्डाचे तसेच मा.जिल्हाधिकारी यांचे आदेश कार्यवाही झाली नाही तो भाग मनपा कडे की सातारा मध्ये हा प्रश्न होता परंतु 15 मी.रस्ता हा मनपा हद्दीत येतो माहिती घेतली असे असतांना अतिक्रमण काढले नाही कार्यवाही होत नसेल तर सभा घेण्याचा अर्थ नाही.

मा.सभापती :सभेला सर्व अधिकारी यांनी उपस्थित असावे. जो प्रश्न उपस्थित केला दोन दिवसात कार्यवाही करावी.

श्री.रावसाहेब आमले :वार्ड 15 मध्ये डी पी रोड आहे तेथे 192 गट नंबर मनपाची आरक्षीत जागा त्यावर शैक्षणीक झोन आहे.02 दिवसात व्हिजीट करून मार्किंग करणार होते कुणीही आले नाही. तसेच 22 जुन 15 ला गट नं 155 संदर्भात माहिती विचारली दिली नाही.

नगररचना अधि.-1 :स.सदस्यांना माहिती दिली आहे.

सहा.संचालक (न.र) :ग.न 155 च्या संदर्भात मा.आयुक्तांनी स्थगिती दिली चौकशी लावलेली आहे. अहवाल मा.आयुक्तांना सादर केला आहे.

मा.सभापती :स.सदस्य यांना माहिती देण्यात यावी अहवाल घेऊ कार्यवाहीचे आदेशीत केले जाईल.मालमत्ता संदर्भात विशेष बैठक लावू.

श्रीमती रेश्मा कुरैशी :मी उपस्थित केलेला प्रश्नाचा खुलासा करावा.

वार्ड अधिकारी -अ :हे क्षेत्र श्री.पाटणी यांचेकडे येते त्यांचेकडून कडून खुलासा घेऊन माहिती दिली जाईल.

मा.सभापती :जो प्रश्न उपस्थित केला त्यांची दखल घेवून कार्यवाही करावी एका अधिकाऱ्याकडे एकच पदाचा चार्ज असावा.

श्री.गजानन बारवाल :महावीर चौकातील उड्डाण पुलाचे व पुलाच्या दोन्ही साईडने रस्ता रूंदीकरणाचे काम हाती घेतले.कॅन्टॉलमेंन्टची जागा घेतली काम सुरू केले.हे करीत असतांना यामध्ये एक दर्गा व दोन मंदीर येत आहे. 700,1400 लाईन येते.केबलचे काम चालू आहे पुल मोकळा करण्यासाठी तसेच पदमपुरा भागातील मिळकत व त्या नागरीकांच्या स्थलांतर विषयी काही निर्णय घेतला काय ?सर्व परवानगी दिली आहे माझ्या माहिती प्रमाणे एमएसआरडीचे काम इलिगल चालू आहे.

शहर अभियंता :या विषयी चर्चा झाली नाही. संबधीत अधिकारी समवेत लवकरच बैठक आयोजित केली जाईल.एमएसआरडीचे कामाने वेग घेतला आहे.मंदीर दर्गा येते की नाही आता सांगता येणार नाही.

श्री.गजानन बारवाल :एमएसआरडीने सहकार्य केले नाही.रस्ता बंद करून काम करीत आहे.मनपास माहिती दिली.परस्पर कामे सुरू केली.

शहर अभियंता :विना अडथळा जागा उपलब्ध करून दयावी लागेल त्यासाठी खर्च लागणार आहे पुलाचे काम तातडीने करून घेतले जाईल.या संदर्भात या आठवडयात संबधीत अधिकारी मनपाचे अधिकारी यांचे समवेत बैठक घेवून मार्ग काढला जाईल.

श्री.गजानन बारवाल :पुलाचे काम,पाण्याची लाईन ,वळण रस्ता शिफ्टीगचे काम महत्वाचे आहे.

मा.सभापती :बैठक आयोजित करून योग्य ती दखल घ्यावी.

श्रीमती ज्योती मोरे :पत्र देऊन महिणा झाला रस्ते दुरूस्त होत नाही लाईटची कामे होत नाही.

मा.सभापती :या वार्डातील त्वरीत कामे करावी.

श्री.मोहन मेघावाले :माझ्या वार्डातील ड्रेनेजचे काम केले.परंतु उध्दवराव पाटील चौक ते सिध्दार्थनगर चौका पर्यतच्या रस्त्याचे सिमेंन्ट कॉक्रीटचे काम का थांबले उत्तर दिले नाही या कामाचा कालावधी किती आहे.

वार्ड अभियंता(ब) :या रस्त्यावर ड्रेनेज लाईनचे काम चालू आहे ते काम झाल्यानंतर सिमेन्ट रस्त्याचे काम पुर्ण केले जाईल.

मा.सभापती :स सदस्यांना माहिती दयावी व तेथील काम तातडीने सुरू करावे.

**विषय क्र. 07 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.हरिभाऊ एस.सपाटे,वरीष्ठ लिपीक, मा.महापौर दालन,नगरसचिव विभाग यांनी स्वतःच्या Acute Inferior Wall Myocardial Inferction यासाठी प्राथमिक उपचार Trombolysation केले व नंतर Angiography c Angioplasty केली (हृदयाचे तीव्र आजार व Angioplasty) या आजारावर उपचार करण्यासाठी र.रू.3,21,682/- (अक्षरी र.रू. तीन लक्ष एकविस हजार सहाशे ब्यांशी मात्र) स्वतः खर्च केले आहे.

त्या अनुषंगाने सदर वैद्यकीय खर्चाचे समायोजन करण्यासाठी संबंधीतांनी सादर केलेल्या वैद्यकीय खर्चाची देयके एकुण रूपये 3,21,682/- सादर केले असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रू.19729 वजा जाता अनुज्ञेय रक्कम रू.3,01,953/- च्या 90 टक्के रक्कम रू.2,71,758/- (अक्षरी रू.दोन लक्ष एकात्तर हजार, सातशे अठ्ठावण्ण मात्र) व त्यापैकी एकत्रीत दाखल केलेल्या खर्च देयकाच्या 05 टक्के रक्कम रू.16,084/- (अक्षरी रू.सोळा हजार चौऱ्यांशी मात्र) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.2,55,674/- (अक्षरी रू.दोन लक्ष पंचावन्न हजार सहाशे चौऱ्यात्तर मात्र) एवढ्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्यात आली असून संबंधीतास अदा करण्यात आलेले आहे. करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या कार्योत्तर मंजुरीस्तव सविनय सादर.

मा.सभापती : विषय मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.हरिभाऊ एस.सपाटे,वरीष्ठ लिपीक, मा.महापौर दालन,नगरसचिव विभाग यांनी स्वतःच्या Acute Inferior Wall Myocardial Inferction यासाठी प्राथमिक उपचार Trombolysation केले व नंतर Angiography c Angioplasty केली (ह्दयाचे तीव्र आजार व Angioplasty) या आजारावर उपचार करण्यासाठी वैद्यकीय खर्चाचे समायोजन करण्यासाठी संबंधीतांनी सादर केलेल्या वैद्यकीय खर्चाची देयके एकुण रूपये 3,21,682/- त्यापैकी अनुज्ञेय नसलेली र.रू.19729 वजा जाता अनुज्ञेय रक्कम रू.3,01,953/-च्या 90% रक्कम रू.2,71,758/-(अक्षरी रू.दोन लक्ष एकात्तर हजार,सातशे अठ्ठावण्ण मात्र) व त्यापैकी एकत्रीत दाखल केलेल्या खर्च देयकाच्या 05 टक्के रक्कम रू.16,084/- (अक्षरी रू.सोळा हजार चौऱ्यांशी मात्र) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.2,55,674/- (अक्षरी रू.दोन लक्ष पंचावन्न हजार सहाशे चौऱ्यात्तर मात्र) एवढ्या अदा करण्यांत आलेल्या वैद्यकीय खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 08 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शिक्षण विभागामार्फत सन 2015-16 या शैक्षणिक वर्षात एकूण 76 शाळेतील इयत्ता बालवाडी ते दहावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शालेय गणवेश खरेदीसाठी प्रती विद्यार्थी रु.400/- (ज्यात- दोन गणवेश खरेदी व शिलाई समाविष्ठ) अशाप्रमाणे एकूण 8,239 विद्यार्थ्यांना एकूण र.रु.32,95,600=00 (अक्षरी बत्तीस लाख पंचान्नाव हजार सहाशे रुपये फक्त) खर्च अपेक्षित आहे.

सदर खर्च हा शिक्षण विभागाच्या लेखाशिर्षा अंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत करण्यात येईल.

| अ.क्र | वर्ग | एकूण विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| 1 | बालवाडी वर्ग | 3385 |
| 2 | इयत्ता पहिले ते आठवी (स.शि.अ.लाभार्थी व्यतिरिक्त) | 3546 |
| 3 | इयत्ता नववी ते दहावी | 1308 |
| | **एकूण** | **8,239** |

सदर दर्शविलेले लाभार्थी हे सर्व शिक्षा अभियान योजना व्यतिरिक्त लाभार्थी आहे. तथा सदर गणवेश खरेदीसाठी, शालेय व्यवस्थापन समिती मार्फत मुख्याध्यापकांच्या नांवे प्रत्यक्ष शाळेतील विद्यार्थ्यांच्या उपस्थिती संख्येनूसार प्रति विद्यार्थी रु.400/- प्रमाणे धनादेश स्वरुपात निधी वितरण करण्यात येईल. सदर निधीचा विनियोग खालील दिलेल्या निर्देशानूसार करावयाचा आहे.

- गणवेशाकरिता कापडाची खरेदी शाळा व्यवस्थापन समितीने करावी. सदर कापडाची खरेदी करतांना कोणत्याही राज्य/केंद्र शासनाच्या सहकारी संस्था, राष्ट्रीय वस्त्रोद्योग संस्था किंवा इतर संस्था यांना प्राधान्य देण्यात येवू नये.
- शाळांनी गणवेश कपडाच्या खरेदीसाठी कामीत कमी तीन पुरवठादारांसाठी अटी व शर्तीसह दर पत्रके मागावावीत. शाळांनी दरपत्रके मागवीतांना त्यामध्ये कापडांचे विवरण (Discription), वैशिष्ट्ये (Specification),रंग(Color),मुले व मुलींसाठी वेगवेगळे नग(Quantity)व पुरवठा कालावधी नमूद करावा.
- शाळा व्यवस्थापन समितीस कापडाची वैशिष्ट्ये (Specification) माहित नसल्यास दरपत्रके मागविताना आवश्यक असलेल्या गणवेश कपडाचा नमूना पुरवठादारास पाठवावा व त्यानुसार दरपत्रके मागवावित.
- दरपत्रके मागविण्याचा कालावधी पुर्ण झाल्यावर शाळा व्यवस्थापन समितीने दरपत्रके उघडून अटी व शर्ती पूर्ण करणार व कमीत कमी दर ज्या पुरवठाधारकांचे असतील त्या पुरवठाधारकास कापडपुरवठा करण्याकामी पुरवठा आदेश निर्गमित करावा.

- प्रत्येक शाळा व्यवस्थापन समितीने त्यांच्या शाळेतील पात्र लाभार्थ्यांच्या वयोगटानुसार व विद्यार्थ्यांच्या मापानुसार (Size प्रमाणे) मुलांसाठी आणि मुलींसाठी लागणाऱ्या कापडाची यादी तयार करुन कापडाची खरेदी करावी.
- कापडाची शिलाई करणेकामी संबंधित शाळा व्यवस्थापन समितीने अटी व शर्तीसह दरपत्रके मागवावी. गणवेश कापड व शिलाई यासाठी मंजूर तरतुदीच्या अधिन राहून वेगवेगळी दरपत्रके मागवावी.
- गणवेश कापड व शिलाई यांच्या देयकाची अदाई संबंधित शाळा व्यवस्थापन समितीने धनादेशाद्वारे करावी. रोख स्वरुपात अदायगी करु नये.
- शाळा स्तरावर दिनांकनिहाय संपूर्ण हिशोब ठेवण्यात यावा.
- गणवेश शिवुन झाल्यानंतर त्यांची तांत्रिक समितीद्वारे तपासणी करुन घेण्यात यावी. त्यांचा योग्य अहवाल प्राप्त झाल्यानंतर मंजूर तरतूदीमधील रक्कम शिल्लक असल्यास, सदर रक्कम त्याच आर्थिक वर्षात मनपा स्तरावर जमा करावी व विनियोग प्रमाणपत्र सादर करुन त्याचे रेकॉर्ड ठेवण्यात यावे.

करिता वरिलप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजनेतून गणवेश खरेदीसाठी अनुदान निधी वितरित करण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल :बन्सीलाल नगर येथील शाळेत मुख्यध्यापकनी वेळेवर ड्रेस देणे बाबत कार्यवाही केली त्या प्रमाणे इतर शाळेत करावे.

श्री.मकरंद कुलकर्णी :9 वी 10 वीच्या विदयार्थ्यांना ड्रेस देतो का ?

शिक्षणाधिकारी :या वर्षी तरतूद केली आहे

मा.सभापती :यासाठी परवानगी देण्यात येते यापूढे कार्यवाही करावी विषय मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागामार्फत सन 2015-16 या शैक्षणिक वर्षात एकूण 76 शाळेतील इयत्ता बालवाडी ते दहावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शालेय गणवेश खरेदीसाठी प्रती विद्यार्थी रु.400/- (ज्यात- दोन गणवेश खरेदी व शिलाई समाविष्ठ) अशाप्रमाणे एकूण 8,239 विद्यार्थ्यांना एकूण र.रु.32,95,600=00 (अक्षरी बत्तीस लाख पंचान्नाव हजार सहाशे रुपये फक्त) च्या अपेक्षित खर्चास तसेच सदर गणवेश खरेदीसाठी, शालेय व्यवस्थापन समिती मार्फत मुख्याध्यापकांच्या नांवे प्रत्यक्ष शाळेतील विद्यार्थ्यांच्या उपस्थिती संख्येनूसार प्रति विद्यार्थी रु.400/- प्रमाणे धनादेश स्वरुपात निधी वितरण करण्यास आणि सदर निधीचा विनियोग प्रस्तावात दिलेल्या निर्देशानूसार करण्यासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.मोहन मेघावाले :शालेय समिती अध्यक्ष कोण असतात.

शिक्षणाधिकारी :सन 2009 च्या ॲक्ट नुसार त्या शाळेतील जे विदयार्थी असेल त्यांचे पालक त्या शालेय समितीचे अध्यक्ष असेल.सर्व शाळेला कळविले आहे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :तेरणा हायस्कूल जवळील भूंखड बाबत माहिती मागितली दिली नाही.

मा.सभापती :स.सदस्यांना माहिती देण्यात यावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद